सांकेतांक क्र 198602522 (99) १५३ 33

~~सांकेतांक क्र 198602522~~

१६६५

क्र.कॉन/एल.आर.३४/दुरुस्ती योजना/८६
पुणे दिनांक २५ -२-१९८६

परिपत्रक

उपसंचालक भूमि अभिलेख,
[सर्व]

विषय :- जमीन एकत्रीकरण योजना
दुरुस्ती योजना तयार करणेबाबत.

संदर्भ :- या कार्यालयाकडील परिपत्रक क्र.कॉन/दुरुस्ती योजना,
दि.१५-९-७६.

जमीन एकत्रीकरण योजना कार्यान्वित झाल्यानंतर त्यात दोष आढळल्यास का.क.३१[अ] प्रमाणे शुध्दीपत्रक व का.क.३२ प्रमाणे दुरुस्ती योजनेची कार्यवाही करण्यात येते. सदरची दुरुस्ती योजना करताना शासनाने आदेश दिलेवरून पोटहिस्सा मोजणीच्या चुका दुरुस्त करावयाच्या झाल्यास त्या शुध्दीपत्रकान्वये म्हणजे का.क.३१[अ] अन्वये न करता का.क.३२ प्रमाणे दुरुस्ती योजना तयार करून त्या दुरुस्त करणेबद्दल इकडील क्र.कॉन/एल.आर.१२७/क-१/८६, दि.६-२-८६ ने अलाहिदा सूचना दिलेल्या आहेत. अशा प्रकरणी प्रथम अधिकार अभिलेख दुरुस्त करून शुध्दीपत्रक/दुरुस्ती योजना तयार करण्याची प्रथा होती. तथापि शासनाने एका अशा प्रकरणी फेर तपासणी अर्जाकामी असे निदर्शनास आणले की, योजना कार्यान्वित झाल्यानंतर व नवीन गा.न.नं.७/१२ लागू झाल्यानंतर, मूळ गा.न.नं.७/१२ अस्तित्वात रहात नाही व त्याचे दुरुस्तीची प्रथा योग्य नाही. म्हणून इकडील परिपत्रक क्र.कॉन/दुरुस्ती योजना, दि.१५-९-७६ मधील परिच्छेद ६[क] अन्वये दिलेल्या सूचना रद्द करणेत येत आहेत व त्याऐवजी खालील सूचना देण्यात येत आहेत.

पोटहिस्सा मोजणी चुकीमुळे कराव्या लागणाऱ्या दुरुस्ती योजनेवेळी ज्या स.नं. ची पोटहिस्सा मोजणी चुकीची होती त्या स.नं.ची म.ज.म.अधिनियम १९६६ मधील कलम ८७ खालील नियमाप्रमाणे प्रथम फलक यंत्राने वहिवाटीप्रमाणे मोजणी करून घेऊन व माजी टिपण, फाळणी वगैरेची पुर्तता करून घेऊन सहाय्यक एकत्रीकरण अधिकारी यांचेकडून तपासणी करून घेणेत यावी व तसा त्यांनी "ए" शीटवर शेरा ठेवावा. क्षेत्रातील दुरुस्तीस एखादे खातेदाराने संमती न दिल्यास मोजणीबाबत हि.फॉ.नं.२ भरून त्यामधील रकाना ६ मध्ये निर्णय नोंदवून त्या खाली सही करावी. तसेच त्या फेर मोजणीकामी इतर कागदपत्र नियमाप्रमाणे तयार केलेवर फाळणीबारा तयार करण्याची आवश्यकता नाही. मात्र दुरुस्त आकारफोड पत्रकावर "या मोजणीचा हि.फॉ.नं.१२ तयार करणेचा नसून यांचा अंमल का.क.३२ अन्वयेच्या दुरुस्ती योजनेत घेण्यात येत आहे " असा शेरा ठेवण्यात यावा.

[signature]

स्व.प्र.वर ज.आ.आ.सं.भू.अ.
म.राज्य,पुणे यांची सही असे.

जमाबंदी आयुक्त आणि संचालक,
भूमि अभिलेख,म.रा.पुणे यांचेकरिता

प्रत - अधिक्षक भूमि अभिलेख [सर्व]/विशेष अधिक्षक भूमि अभिलेख आणि एकत्रीकरण अधिकारी [सर्व] यांचेकडे त्यांचेकडील सहाय्यक एकत्रीकरण अधिकारी यांना द्याव्या लागणाऱ्या प्रतिसह माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित.

प्रतिलिपी - कार्यासन अधिकारी- क-१ ते ७ / ल-१, ल-२ यांना माहितीसाठी.

लेले २४२